


# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे




वर्ष ६ । अंक ३४ । सोमवार २६ ऑक्टोबर २०२६ । पाने ४ मूल्य ₹ २    https://epaper.dainkaakarshan.com    E-mail- dainikaakarshan@gmail.com    RNI NO. MAHMAR/2021/84322

### तरुण व्यावसायिकाला मारहाण प्रकरण

# भाजप नगरसेवक सागर मुर्तडकरला पोलीस कोठडी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** शहरातील नगर–पुणे रोडवर गेल्या महिन्यात तरुण व्यावसायिक रोहित पाथरकर यांना झालेल्या मारहाण प्रकरणातील मुख्य आरोपी असलेले भाजप नगरसेवक सागर राजू मुर्तडकर (वय ३२ वर्षे, रा. वंजार गल्ली, मंगलगेट) याला न्यायालयाने आज, सोमवारी एक दिवसाची पोलीस कोठडी (पीसीआर) सुनावली. जिल्हा न्यायालयाने या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत मुर्तडकरचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळल्यानंतर त्याने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. मात्र हायकोर्टातही मुर्तडकरला दिलासा मिळू शकला नाही. त्यामुळे मुर्तडकर हा पोलिसांना शरण आला व त्याने गुन्ह्यात वापरलेले हत्यार व वाहन पोलिसांच्या स्वाधीन केले. आज न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला एक दिवसाच्या पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला.

### आठ गंभीर जखमांची नोंद

फिर्यादी रोहित पाथरकर यांना झालेली मारहाण अत्यंत गंभीर स्वरूपाची असून, वैद्यकीय अहवालातही दोन गंभीर दुखापतींसह एकूण आठ जखमांची नोंद आहे. त्यांच्या चेहऱ्याचे आणि नाकाचे हाड फ्रॅक्चर झाले आहे. तसेच आरोपीने फिर्यादीच्या छातीवर बसून नाक–तोंड दाबून श्वास कोंडत त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला. असे मुद्दे सरकार पक्ष व फिर्यादीच्या वकिलांच्या वतीने न्यायालयासमोर मांडण्यात आले.

### सरकार पक्षाचे मुद्दे

आरोपी पोलिसांच्या विचारपुशीत उडवाउडवीची उत्तरे देत असून तपासात अजिबात सहकार्य करत नाही. या गंभीर गुन्ह्यामध्ये आरोपी सागर मुर्तडकर याचा प्रथमदर्शनी स्पष्ट सहभाग दिसून येत आहे. या गुन्ह्याचा अधिक बारकाईने आणि सखोल तपास करणे अद्याप बाकी असल्याने आरोपीकडे कसून चौकशी करणे गरजेचे आहे. गुन्ह्यात सहभागी असलेल्या इतर साथीदारांचा शोध घेणे व त्यांच्या भूमिकेचा तपास करणे आवश्यक आहे, असे मुद्दे सरकार पक्षाच्या वतीने न्यायालयासमोर मांडण्यात आले.

### भाजप नगरसेवकाची गुन्हेगारी पार्श्वभूमी

या वर्षी जानेवारीमध्ये झालेल्या महापालिका निवडणुकीत सागर मुर्तडकर हा भाजपकडून प्रभाग १० मधून नगरसेवक म्हणून निवडून आला. परंतु गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या या नगरसेवकावर वर्षभराच्या आतच गंभीर दुखापतीचा गुन्हा दाखल झाल्याने भाजपच्या वर्तुळातही अस्वस्थता आहे. पक्षाने अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांचा विचार करण्याची गरज निष्ठावान भाजप कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे.

### मागील महिन्यात घडली घटना

गेल्या महिन्यात १४ सप्टेंबरच्या मध्यरात्री नगर–पुणे रोडवरील राजश्री हॉटेलसमोर व्यावसायिक रोहित पाथरकर यांच्यावर हल्ला झाला होता. रोहित पाथरकर हे मित्रासोबत घरी परतत असताना सागर मुर्तडकर आणि त्याचा भाऊ आकाश, श्रीकांत तसेच कार्यकर्ते गणेश सुंबे व शिवम शिंगटे यांनी त्यांना अडवून बेदम मारहाण केली होती. या हल्ल्यात रोहित पाथरकर गंभीर जखमी झाले व त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार करण्यात आले. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात भाजप नगरसेवक सागर मुर्तडकर आणि त्याच्या इतर चार साथीदारांवर जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या गुन्ह्यात अटकपूर्व जामीन मिळवण्यासाठी काही दिवसांपूर्वी सागर मुर्तडकरने जिल्हा न्यायालयात व नंतर हायकोर्टात अर्ज दाखल केला होता. परंतु हायकोर्टातही अटकपूर्व जामीन फेटाळल्याने अखेर मुर्तडकर पोलिसांना शरण आला. मुख्य आरोपी सागर मुर्तडकर वगळता त्याच्या इतर चार साथीदारांना अटकपूर्व जामीन मंजूर झालेला आहे.

### गुन्हेगारी सहभाग निष्पन्न

कोतवाली पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यात भाजप नगरसेवक सागर राजू मुर्तडकर याला प्रमुख आरोपी म्हणून निष्पन्न करण्यात आले असून, त्याला दि. २५ ऑक्टोबर रोजी रात्री पावणेनऊ वाजता अटक करण्यात आली आहे. पोलिसांकडून या गुन्ह्याच्या पुढील तपासासाठी त्याच्या ३ दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी करण्यात आली होती. या प्रकरणात आरोपीवर भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११८(२), ११५(२), १८९(२), १९०, १९१(२), ३५१(२) आणि ३५२ या गंभीर कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीने गुन्ह्यात वापरलेले हत्यार म्हणून एक लोखंडी चौकोनी पोकळ रॉड आणि गुन्ह्यात वापरलेली पाच लाख रुपये किमतीची गडद निळ्या रंगाची महिंद्रा एक्सयूव्ही ७०० (एमएच १६ डीएफ ०२००) हे वाहन असा एकूण ५ लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी तपासादरम्यान जप्त केला आहे.

# राहुरीतील वाहतूक कोंडीचा प्रश्न दोन दिवसांत मार्गी लावणार!

### माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांची ग्वाही; प्रशासनाला तातडीच्या उपाययोजनांच्या सूचना

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**राहुरी–** नगर–मनमाड महामार्गावर राहुरी शहर ते नांदगाव शिंगवे दरम्यान गेल्या तीन दिवसांपासून निर्माण झालेल्या भीषण वाहतूक कोंडीची माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी वाहतूक कोंडीची कारणे जाणून घेत प्रशासनाला आवश्यक त्या सूचना दिल्या. येत्या दोन दिवसांत प्रशासन आणि संबंधित ठेकेदार यांची बैठक घेऊन वाहतूक कोंडीचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

नगर–मनमाड महामार्गावर गेल्या तीन दिवसांपासून वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असून, वाहनचालकांसह प्रवाशांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. राहुरी शहर ते नांदगाव शिंगवे तसेच चिंचोली फाटा ते कोल्हारदरम्यान वाहतुकीचा खोळंबा होत असल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला ■ पान ४ वर

# जन्मदात्या पित्याचा मुलांनीच खून केल्याचे निष्पन्न

### वाकोडीतील खुनाच्या गुन्ह्याची एलसीबीकडून उकल, एकास अटक

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील वाकोडी येथे एका ४२ वर्षीय व्यक्तीची अज्ञातांनी हत्या केल्याची घटना नुकतीच उघडकीस आली होती. या गुन्ह्याचा समांतर तपास करताना स्थानिक गुन्हे शाखेने धक्कादायक सत्याचा उलगडा केला आहे. या व्यक्तीचा खून दुसऱ्या कोणीही नसून त्याच्याच पोटच्या मुलांनी केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी पोलिसांनी एका मुलाला बेड्या ठोकल्या आहेत.

दिलीप करमदास भोसले (वय ४२, रा. वाकोडी शिवार, सोलापूर रोड, अहिल्यानगर) असे खून झालेल्या ■ पान ४ वर

# शेतीच्या वादातून तलवारीने हल्ला, चौघांना ७ वर्षे सक्तमजुरी व दंड

### श्रीगोंदा न्यायालयाचा निकाल, काष्टी येथे नऊ वर्षांपूर्वी घडली होती घटना

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शेतात जेसीबीच्या साहाय्याने बाभळीची झाडे काढताना झालेल्या वादात तलवारीने जीवघेणा हल्ला करणाऱ्या काष्टी (ता. श्रीगोंदा) येथील चार आरोपींना श्रीगोंदा सत्र न्यायालयाने सात वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे. श्रीगोंदा सत्र न्यायालय क्र. २ चे न्यायाधीश श्री. एस. एच. साळुंखे यांनी दि. २३ ऑक्टोबर रोजी हा महत्त्वपूर्ण निकाल दिला.

नऊ वर्षांपूर्वी, दिनांक १५ मे २०१७ रोजी फिर्यादी अंकुश बापूराव खोरे (वय ६०, रा. काष्टी) हे त्यांच्या शेतात मशागत करून जेसीबीने वेड्या बाभळीची झाडे काढत होते. यावेळी तू जेसीबीने बाभळी का काढतोस, यामुळे आमच्या पाईपचे नुकसान होईल असे म्हणून आरोपी अशोक गोविंद पाचपुते, नानासाहेब राजाराम पाचपुते, दीपक अशोक पाचपुते आणि दत्ता गोविंद पाचपुते (सर्व रा. काष्टी) यांनी फिर्यादींशी वाद घातला. शिवीगाळ व दमदाटी करत त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. याचदरम्यान आरोपी अशोक पाचपुते याने फिर्यादीचा मुलगा पांडुरंग खोरे यांच्या डोक्यावर तलवारीने वार करून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला. वार अडवताना पांडुरंग यांच्या हाताचे बोट फॅक्चर झाले. घटनेनंतर आरोपींनी तलवार लपवून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर सपोनि संजयकुमार सोने आणि उपनिरीक्षक ■ पान ४ वर

### न्यायालयाने दिलेला निर्णय

न्यायालयाने कलम ३०७ व ३४ अन्वये चारही आरोपींना प्रत्येकी ७ वर्षे सक्त कारावास आणि एक हजार रुपये दंड व दंड न भरल्यास १ महिना अतिरिक्त सक्त कारावास अशी शिक्षा ठोठावली. कलम ५०६ व ३४ अन्वये चारही आरोपींना प्रत्येकी २ वर्षे सक्त कारावास आणि ५०० रुपये दंड. कलम २०१ अन्वये पुरावा नष्ट केल्याप्रकरणी मुख्य आरोपी अशोक पाचपुते याला स्वतंत्रपणे २ वर्षे सक्त कारावास आणि ५०० रुपये दंड याप्रमाणे शिक्षा ठरवण्यात आली.सर्व शिक्षा आरोपींना एकाच वेळी भोगावयाच्या आहेत.

# संगमनेरमध्ये अन्न व औषध प्रशासनाचा मोठा छापा; १५ लाखांचा संशयास्पद धने व बडीशेपचा साठा जप्त

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सण–उत्सवांच्या (फेस्टिव्हल ड्राईव्ह २०२६) पार्श्वभूमीवर सर्वसामान्यांना शुद्ध आणि सुरक्षित अन्नपदार्थ मिळावेत याकरिता अन्न व औषध प्रशासन विभाग पूर्णपणे ॲक्टिव्ह मोडवर आला आहे. राज्याचे अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे, नाशिक विभागाचे संयुक्त आयुक्त श्री. माने आणि अन्न विभागाचे सहायक आयुक्त एस. एच. इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा पथकाने २४ ऑक्टोबर २०२६ रोजी संगमनेर येथील एका अन्न प्रक्रिया उद्योगावर धडक कारवाई केली. या छाप्यात सुमारे १५,००,५६६/– (पंधरा लाख पाचशे सहासष्ट) रुपये किमतीचा संशयास्पद आणि मिसब्रँडेड अन्नसाठा जप्त करण्यात आला आहे.

**कारवाईचा तपशील खालीलप्रमाणे**

प्रतिष्ठानचे नाव व पत्ता: मेसर्स जगदंबा फूड प्रॉडक्ट्स, तालुका– संगमनेर, जिल्हा– अहिल्यानगर.

जप्त केलेला मुद्देमाल व किंमत: १) धने डाळ : एकूण ५,९९८ किलोग्रॅम साठा (किंमत रु. ८,९९,७००/–). सदर साठा डी. ए. पटेल, उंझा, गुजरात या पुरवठादाराकडून मागवण्यात आला होता.

२) बडीशेप : एकूण ३,५९८ किलोग्रॅम साठा (किंमत रु. ६,००,८६६/–). हा साठा देखील डी. ए. पटेल, उंझा, गुजरात यांच्याकडून आलेला होता. एकूण जप्त साठा व किंमत: एकूण ९,५९६ किलो ग्रॅम, एकूण किंमत रु. १५,००,५६६/–

**कारवाईचे कारण:** सदर अन्नपदार्थांचा साठा हा मिसब्रँडेड (चुकीची लेबलिंग असलेला) आणि कमी दर्जाचा () किंवा आरोग्याला अपायकारक () असल्याच्या संशयावरून जप्त करण्यात आला आहे. अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी या साठ्याचे नमुने () विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठवले असून, अहवाल प्राप्त झाल्यानंतर कायद्यानुसार पुढील कडक कारवाई केली जाईल.

कारवाई करणारे पथक: अन्न व औषध प्रशासनाचे अन्न सुरक्षा अधिकारी () यु. आर. सूर्यवंशी आणि सहायक आयुक्त (अन्न) परिमंडळ–२ अहिल्यानगर, श्री. एस. एच. इंगळे यांच्या पथकाने ही यशस्वी कारवाई केली. सण–उत्सवांच्या काळात अन्नपदार्थांमध्ये होणारी भेसळ आणि नियमबाह्य विक्री रोखण्यासाठी प्रशासनाची ही मोहीम अशीच तीव्र गतीने सुरू राहणार असून, ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा इशारा अन्न व औषध प्रशासनाने दिला आहे.

# काँग्रेसला येत असलेल्या अपयशामुळे मल्लिकार्जुन खरगेंचे वैफल्यग्रस्त विधान - ना. राधाकृष्ण विखे पाटील

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कुटुंबियांच्या संदर्भात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केलेले विधान हे संपूर्णपणे वैफल्यग्रस्त भावनेतून आहे. सर्व स्तरांवर पक्षाला येत असलेल्या अपयशाची ही एक केविलवाणी कबुली असून, अत्यंत खालच्या स्तरावरील वक्तव्य करून त्यांनी राजकारणातील सर्व संकेत मोडीत काढले आहेत, अशी खरमरीत टीका जलसंपदा तथा पालकमंत्री ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना केली.

मल्लिकार्जुन खरगे यांनी केलेल्या वक्तव्याचा तीव्र शब्दांत निषेध करून मंत्री ना. विखे पाटील म्हणाले की, राजकारणामध्ये काही सभ्यता आणि संकेत पाळायचे असतात, परंतु खरगे यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याकडून अशा पद्धतीचे अनुद्गार काढले जाणे अत्यंत दुर्दैवी आहे. राजकीय विरोधाच्या नावाखाली इतक्या खालच्या पातळीवर जाऊन वक्तव्य करणे ही काँग्रेसने गाठलेली वैचारिक दिवाळखोरीची परिसीमा आहे.

काँग्रेस पक्षाला सर्वच स्तरांवर मोठे अपयश येत असून, देशातील जनतेने वेळोवेळी दिलेला पराभवाचा कौल त्यांना अजूनही पचविता आलेला नाही. वेगवेगळ्या कारणांसाठी त्यांनी अनेक आंदोलने करून पाहिली, सीजेपीचाही आधारही घेऊन पाहिला; पण देशातील सुज्ञ जनता त्यांना प्रतिसाद द्यायला अजिबात तयार नाही. त्यामुळेच आता वैफल्यग्रस्त भावनेतून त्यांची ही वादग्रस्त वक्तव्ये समोर येऊ लागली आहेत. देशाच्या लोकप्रिय पंतप्रधानांच्या कुटुंबियांबद्दल अपमानकारक भाषा देशातील सुजाण जनता कधीही सहन करणार नाही आणि राजकारणातील संकेत मोडणाऱ्या लोकांना जनता कधीही थारा देणार नाही, असा इशाराही मंत्री विखे पाटील यांनी दिला.

रायगड जिल्ह्यातील कर्जत येथील ऊर्जा प्रकल्पाचा मूळ विषय नीट समजून न घेता त्यावर राजकीय भाष्य करणे योग्य नाही, असे स्पष्ट करत पालकमंत्री म्हणाले की, "मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संदर्भातील सर्व भूमिका स्पष्टपणे मांडली आहे. तिथे सुरू होणाऱ्या आधुनिक ऊर्जा प्रकल्पामुळे राज्याचा विजेचा प्रश्न कायमचा सुटणार आहे. या प्रकल्पामुळे स्थानिक पर्यावरणाला कोणताही धोका निर्माण होईल, अशी वस्तुस्थिती नाही. उलट, नियोजित क्षेत्रापेक्षा दुप्पट वृक्षारोपण करून निसर्गाचे संवर्धन अधिक प्रभावीपणे केले जाणार आहे.

जिल्ह्यातील चारा टंचाईच्या उपाययोजनांबाबत माहिती देताना मंत्री ना. विखे पाटील म्हणाले की, पशुधनासाठी चाऱ्याचे सूक्ष्म नियोजन प्रशासकीय पातळीवर करण्यात आले आहे. ■ पान ४ वर

# दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यासाठी दर्जेदार फटाके उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न : आमदार संग्राम जगताप

### कल्याण रोडवरील घाऊक फटाका मार्केटचा आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते शुभारंभ । दर्जेदार फटाके, उत्तम पार्किंग सुविधा; दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यासाठी अहमदनगर फटाका व्यापारी असोसिएशनचा उपक्रम

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर कल्याण रोड येथे अहमदनगर फटाका व्यापारी असोसिएशनच्या वतीने उभारण्यात आलेल्या घाऊक फटाका मार्केटचा शुभारंभ आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आला. दिवाळीच्या सणात नागरिकांना दर्जेदार फटाके एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावेत, या उद्देशाने असोसिएशनच्या वतीने दरवर्षी या मार्केटचे आयोजन करण्यात येते. यंदाही ग्राहकांच्या सोयीसाठी विविध प्रकारचे फटाके, आवश्यक सुविधा आणि उत्तम पार्किंग व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. या उपक्रमामुळे दिवाळीच्या खरेदीसाठी नागरिकांना सोयीचे ठिकाण उपलब्ध झाले आहे.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, दिवाळी हा आनंद, उत्साह आणि मांगल्याचा सण असून, या सणानिमित्त नागरिकांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळतो. दिवाळीच्या काळात घरे, दुकाने आणि परिसर रोषणाईने उजळून निघतात. कुटुंबीय, मित्रपरिवार आणि आप्तस्वकीयांसोबत आनंद साजरा करताना फटाक्यांनाही विशेष महत्त्व असते. नागरिकांचा हाच आनंद द्विगुणित करण्यासाठी अहमदनगर फटाका व्यापारी असोसिएशनच्या वतीने कल्याण रोडवर अधिकृत फटाका मार्केट उभारण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही या मार्केटचे नियोजन करण्यात आले असून, नागरिकांना विविध प्रकारचे फटाके एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. ग्राहकांना चांगल्या दर्जाचे फटाके मिळावेत आणि त्यांची खरेदी अधिक सुलभ व्हावी, या दृष्टीने व्यापारी असोसिएशनने केलेला हा उपक्रम महत्त्वपूर्ण आहे.

ते पुढे म्हणाले की, सण–उत्सवांच्या काळात नागरिकांची खरेदीसाठी होणारी गर्दी लक्षात घेऊन बाजारपेठेत आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे असते. कल्याण रोडवरील या फटाका मार्केटमध्ये ग्राहकांसाठी उत्तम पार्किंग व्यवस्था करण्यात आली असून, खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांना त्याचा लाभ होणार आहे. व्यापारी आणि ग्राहक यांच्यातील विश्वासाचे नाते अधिक दृढ होण्यासाठी दर्जेदार वस्तू आणि चांगली सेवा महत्त्वाची असते. अहमदनगर फटाका व्यापारी असोसिएशनने या बाबींचा विचार करून मार्केटचे नियोजन केले आहे. दिवाळीच्या निमित्ताने व्यापाऱ्यांना व्यवसायाची संधी मिळते, तर ग्राहकांनाही एकाच ठिकाणी विविध पर्याय उपलब्ध होतात. अशा उपक्रमांमुळे स्थानिक व्यापाराला चालना मिळते आणि सणाचा उत्साह वाढतो. नागरिकांनी फटाके खरेदी करताना त्यांचा दर्जा तपासावा, अधिकृत विक्रेत्यांकडूनच ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### ३४ वर्षांच्या नेत्रसेवेचा गौरव! जालिंदर बोरुडे यांना 'कार्य गौरव सन्मान'

अहिल्यानगर- दृष्टीदोष असलेल्या व्यक्तींच्या




जीवनात प्रकाश आणण्यासाठी गेल्या ३४ वर्षांपासून अखंडपणे नेत्रसेवेचे कार्य करणारे फिनिक्स सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल 'कार्य गौरव सन्मान' प्रदान करून गौरविण्यात आले. दिव्य दृष्टी फाउंडेशन आणि शोभा सर्वोदय फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सन्मान सोहळ्यात ब्रिगेडिअर राजीव चावला आणि उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते बोरुडे यांना सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला धनश्री विखे, वरिष्ठ डाक अधीक्षक विकास पालवे, पोलीस उपअधीक्षक शिरीष वमने, हरजितसिंघ वधवा आणि दिव्य दृष्टी फाउंडेशनचे कृष्णा तवले आदी मान्यवर उपस्थित होते. गेल्या साडेतीन दशकांपासून नेत्रसेवेच्या माध्यमातून समाजातील गरजू नागरिकांना दृष्टीचा आधार देणाऱ्या बोरुडे यांच्या कार्याची यावेळी विशेष दखल घेण्यात आली.फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून जालिंदर बोरुडे यांनी ग्रामीण आणि शहरी भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांपर्यंत नेत्रसेवेचा लाभ पोहोचविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. आर्थिक अडचणींमुळे डोळ्यांचे आजार असूनही उपचार घेणे शक्य होत नसलेल्या रुग्णांसाठी त्यांनी विविध ठिकाणी नेत्रतपासणी व उपचार शिबिरांचे आयोजन केले.या शिबिरांमधून गरजू रुग्णांची नेत्रतपासणी करून आवश्यक उपचारांची व्यवस्था करण्यात आली. तसेच मोतिबिंदूचा त्रास असलेल्या अनेक रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्या. यामुळे अनेक ज्येष्ठ नागरिकांसह गरजू रुग्णांना पुन्हा स्पष्टपणे पाहण्याची संधी मिळाली. दृष्टीच्या समस्येमुळे दैनंदिन जीवनात अडचणींचा सामना करणाऱ्या रुग्णांना दिलासा मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून करण्यात आले.नेत्रदानामुळे अंधत्व असलेल्या व्यक्तींच्या जीवनात आशेचा नवा किरण निर्माण होऊ शकतो, हा संदेश समाजाच्या विविध स्तरांपर्यंत पोहोचविण्यासाठी जालिंदर बोरुडे यांनी सातत्याने जनजागृती केली आहे. मरणोत्तर नेत्रदान ही समाजाची सामूहिक जबाबदारी असल्याची जाणीव नागरिकांना करून देताना त्यांनी नेत्रदानाबाबतचे गैरसमज दूर करण्यावर भर दिला.

## अहिल्यानगरमध्ये २६ ते २८ ऑक्टोबर दरम्यान हत्तीरोग रक्तनमुने सर्वेक्षण

**रात्री १० ते १२ या वेळेत नागरिकांचे रक्तनमुने घेणार; शहरातून ९०० नमुने संकलित करण्याचे उद्दिष्ट । स्थलांतरित, झोपडपट्टी परिसर आणि पूर्वी रुग्ण आढळलेल्या भागांवर विशेष लक्ष**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेचा आरोग्य विभाग आणि जिल्हा हिवताप कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात हत्तीरोग रात्र रक्तनमुने सर्वेक्षण () मोहीम राबविण्यात येणार आहे. २६ ते २८ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत दररोज रात्री १० ते १२ या वेळेत हे सर्वेक्षण करण्यात येणार असून, संपूर्ण शहरातून एकूण ९०० रक्तनमुने संकलित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

या सर्वेक्षणासाठी स्थलांतरित नागरिकांची वस्ती असलेले भाग, झोपडपट्टी परिसर तसेच यापूर्वी हत्तीरोगाचे सर्वाधिक रुग्ण आढळलेल्या भागांना प्राधान्य दिले जाणार आहे. निवडक ठिकाणी २० वर्षे व त्यावरील वयोगटातील नागरिकांचे रात्रीचे रक्तनमुने घेऊन त्यांची हत्तीरोगाच्या जंतूंसाठी तपासणी करण्यात येणार आहे.

हत्तीरोगाचे जंतू म्हणजेच मायक्रोफायलेरिया रात्रीच्या वेळी रक्तात अधिक सक्रिय असल्याने रात्री १० वाजल्यानंतरच रक्तनमुने संकलित केले जाणार आहेत. या तपासणीतून हत्तीरोगाच्या जंतूंचा संसर्ग शोधण्यास मदत होणार आहे.

सर्वेक्षणातून प्राप्त होणाऱ्या निष्कर्षांच्या आधारे फेब्रुवारी २०२७ मध्ये राबविण्यात येणाऱ्या सामूहिक औषधोपचार मोहिमेचे () नियोजन करण्यात येणार आहे. त्यामुळे हत्तीरोग नियंत्रण आणि निर्मूलनाच्या दृष्टीने या सर्वेक्षणाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

महानगरपालिका आरोग्य विभाग आणि जिल्हा हिवताप कार्यालयाच्या वतीने नागरिकांना या मोहिमेत सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आरोग्य कर्मचारी रक्तनमुना घेण्यासाठी घरी किंवा परिसरात आल्यास नागरिकांनी त्यांना सहकार्य करावे. रक्तनमुना देण्याची प्रक्रिया सुरक्षित असून, हत्तीरोग निर्मूलनासाठी ती महत्त्वाची आहे.

ही मोहीम वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर आणि जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. नारायण वायभासे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. शहरातील नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवून हत्तीरोग निर्मूलनाच्या प्रयत्नांना सहकार्य करावे, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## राज्य प्राथ.शिक्षक बँकांच्या समन्वयकपदी बापूसाहेब तांबे यांची निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** सातारा, सांगली ,व कोल्हापूर येथील प्राथमिक शिक्षक जिल्हा बँकेच्या प्रमुख पदाधिकारी यांची शिक्षक नेते बापूसाहेब तांबे यांचे नेतृत्वाखाली राष्ट्रीय सहकार धोरण उच्चस्तरीय समिती सदस्य, व केंद्रीय संचालक रिझर्व बँक ऑफ इंडिया, तसेच नाबार्ड बँक संचालक सतीश मराठे साहेब यांचे समवेत कल्याण जनता सहकारी बँक, कल्याण, मुंबई येथे संचालक मंडळ सभागृहामध्ये राज्यातील सर्व प्राथ.शिक्षक बँकेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली.

यावेळी सतीशजी मराठे साहेब यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत अहिल्यानगर शिक्षक बँक आपल्या कामाच्या रूपातून राज्यात इतर बँकासाठी आदर्शवत असल्याने व त्याचे नेतृत्व बापूसाहेब तांबे हे करत असल्याने सांगली बँकेचे नेते अविनाश गुरव यांनी बापूसाहेब तांबे यांची राज्यातील सर्व प्राथ.शिक्षक बँकांच्या समन्वयक पदी निवडीचा ठराव मांडला त्यास सातारा, कोल्हापूर व अहिल्यानगर बँक पदाधिकाऱ्यांनी अनुमोदन दिले. त्यांच्या या निवडीबद्दल सतीश मराठे व सर्व बँकांचे प्रतिनिधी यांचे हस्ते तांबे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अहिल्यानगर जिल्हा प्राथ. शिक्षक बँकेचे माजी चेअरमन डॉ.संदीप मोटे यांनी बापूसाहेब तांबेच्या रूपाने अहिल्यानगर जिल्ह्यावर टाकलेली जबाबदारी आम्ही सक्षमपणे पेलवू असे आश्वासन देत सर्वांचे आभार मानले.

यावेळी बापूसाहेब तांबे यांनी पगारदार नोकरांच्या बँकांचे अनेक प्रश्न मांडले, यात प्रामुख्याने नवीन शाखा उघडणेसाठीची एक हजार सभासदांची अट रद्द करणे, पगारदार नोकरांच्या बँकेच्या सभासदांची संख्या कमी होत असल्याने कर्जाच्या बाबतीत तारणी कर्ज देण्याची सुविधा आम्हाला देण्यात यावी तसेच इतर मार्गाने मिळणारे उत्पन्न या बँकाना नसल्याने नफ्यावरील टॅक्स दरात थोडी सवलत मिळावी जेणेकरून सभासदांना अधिकचा लाभांश देता येईल असे प्रश्न गांभीर्याने घेण्यात यावे अशी भूमिका तांबे यांच्यासह चारही बँकेच्या पदाधिकाऱ्यांनी मराठे यांचेसमोर मांडली.

## अभिनेत्री भार्गवी चिरमुले यांनी दिली अहिल्यानगरातील 'चिंतामण रामचंद्र देशमुख सराफ'च्या पेढीला सदिच्छा भेट



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मराठी सिनेसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री भार्गवी चिरमुले यांनी नुकतीच अहिल्यानगरातील नामांकित व मानाची परंपरा लाभलेल्या 'चिंतामण रामचंद्र देशमुख सराफ' च्या दालनाला सदिच्छा भेट दिली. यावेळी सुवर्णपेढीचे संचालक श्री. दिनेश देशमुख आणि श्री. मयुरेश देशमुख यांनी त्यांचे मनापासून स्वागत केले.

भार्गवी चिरमुले यांनी एका कार्यक्रमाच्या निमित्ताने अहिल्यानगरला भेट दिली होती. यावेळी चिंतामण रामचंद्र देशमुख सराफच्या पेढीला भेट दिल्यावर त्यांनी येथील पारंपरिक वारसा, विश्वासार्हता आणि आधुनिक कलाकुसरीच्या दागिन्यांचे भरभरून कौतुक केले.

या भेटीदरम्यान भावना व्यक्त करताना त्या म्हणाल्या, ''दागिना हा प्रत्येक स्त्रीच्या मनातील अत्यंत जिव्हाळ्याचा विषय असतो. आज चिंतामण रामचंद्र देशमुख सराफ मध्ये आल्यावर एका समृद्ध पेढीची परंपरा आणि संस्कृती जवळून अनुभवायला मिळाली. जुन्या काळापासून सुरू झालेला हा सुवर्णप्रवास आजही त्याच विश्वासाने जपला गेला आहे. येथे केवळ अस्सल व शुद्ध सोनंच नाही, तर प्रत्येकाच्या खिशाला परवडतील असे ट्रेंडी आणि नाजूक डिझाइन्सचे दागिने एकाच छताखाली उपलब्ध आहेत.''

या प्रसंगी देशमुख कुटुंबीयांच्या वतीने भार्गवी चिरमुले यांना त्यांच्या वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ एक सुंदर चांदीचे पेन भेट म्हणून देऊन सन्मानित करण्यात आले. या अनोख्या आणि भावनिक भेटीबद्दल कृतज्ञता व्यक्त करत त्यांनी देशमुख परिवाराचे आभार मानले.

शुद्ध सोने, पिढ्यानपिढ्यांचा विश्वास आणि मनमोहक दागिन्यांच्या खरेदीसाठी चिंतामण रामचंद्र देशमुख सराफ हेच सुवर्णप्रेमींचे हक्काचे ठिकाण असल्याचे त्यांनी नमूद केले.

## आनंदधाम परिसरात उत्तराध्ययन श्रुतदेव आराधना भक्ती यात्रा उत्साहात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** आनंदधाम परिसरातील आनंद तीर्थ समवशरण येथे उपाध्याय प्रवर पूज्य प्रविणऋषीजी म.सा. यांचा समर्पण चातुर्मास भाविकांच्या अलोट उत्साहात साजरा होत आहे. यात तीर्थंकर निर्वाण कल्याणक उत्तराध्ययन श्रुतदेव आराधना सुरू आहे. यानिमित्त रविवारी सकाळी भव्य आराधना भक्ती यात्रा काढण्यात आली. गांधी परिवार या यात्रेचे लाभार्थी होता.

गांधी परिवाराचा सुपुत्र तथा आंतरराष्ट्रीय कॉर्फबॉल खेळाडू दिशान किशोर गांधी जैन ध्वज घेऊन यात्रेच्या अग्रभागी होता. यानंतर पवित्र उत्तराध्ययन श्रुतदेव आराधना ग्रंथ, नवकार कलशधारी श्राविका, तीर्थंकरांचा संदेश देणारे फलक घेतलेले श्रावक, श्राविका यात सहभागी झाले होते. भगवान महावीरांचा जयकारा करत सर्वांनी जिनेश्वरीचा, जैन परंपरांचा जागर केला. महिला भगिनींनी क्रिम, केसरी, लाल रंगाच्या साडी तर पुरुष भाविकांनी व्हाईट रंगाची वेशभूषा परिधान केली होती.

यावेळी भक्ती यात्रेचे लाभार्थी गांधी गोत्र परिवारातील आबालवृद्ध सदस्य तसेच समर्पण चातुर्मास कमिटीचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते. माजी खा. दिलीप गांधी यांच्या निवासस्थानापासून निघालेल्या या यात्रेचा समारोप आनंद तीर्थ समवशरण येथे झाला.

उत्तराध्यायन श्रुतदेव आराधना तीर्थंकर भगवान महावीर यांची निर्वाण कल्याणक अंतिम देशना आहे. तीर्थंकरांनी २६०० वर्षांपूर्वी आदर्श जीवन पद्धतीचे सूत्र यात सांगितले होते. आजच्या काळातील सर्व समस्यांची उत्तरे यात मिळतात. पूज्य प्रविणऋषीजी महाराज यांच्या मुखारविंदातून ही भक्ती गाथा ऐकण्यासाठी भाविक मोठ्या उत्साहाने एकत्र येत आहेत.

## नगर शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नांदगाव शिवारात महावितरणच्या सोलर बसविण्याच्या कामादरम्यान महानगरपालिकेची ११०० एमएम व्यासाची मुख्य जलवाहिनी फुटल्याने शहराच्या पाणीपुरवठ्यावर मोठा परिणाम झाला आहे. दुरुस्तीच्या कामात तांत्रिक अडचणींमुळे विलंब होत असल्याने शहराच्या मध्यवर्ती भागासह अनेक उपनगरांमध्ये उशिराने आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करण्याचे आवाहन मनपा पाणीपुरवठा विभागाने केले आहे.

शुक्रवार (दि. २३) सायंकाळी ५.३० वाजेच्या सुमारास नांदगाव शिवारातील रभाई ओढ्यामध्ये महावितरणमार्फत ड्रीलद्वारे खोदकाम सुरू असताना ही मुख्य जलवाहिनी फुटली. मोठ्या प्रमाणावर पाणी वाया जात असल्याने मुळानगर येथून होणारा पाणी उपसा तातडीने बंद करून दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले. मात्र, भौगोलिक परिस्थिती आणि तांत्रिक अडचणींमुळे कामास विलंब होत असल्याने शहराच्या पाण्याच्या टाक्या पूर्ण क्षमतेने भरणे शक्य झालेले नाही.

यामुळे शुक्रवारी रोटेशननुसार पाणी मिळणाऱ्या भागात पाणीपुरवठा होऊ शकला नाही. तर, शनिवारी रोटेशन असलेल्या शहराच्या मध्यवर्ती भागात उशिराने व कमी दाबाने पाणीपुरवठा होईल, असे मनपा पाणीपुरवठा विभाग प्रमुख मडळकर यांनी स्पष्ट केले आहे.

पाईपलाईन रोड, निर्मलनगर, सूर्यनगर, लक्ष्मीनगर, कल्याण रोड, शिवाजीनगर, केडगावचा काही भाग, मुकुंदनगर, सारसनगर आणि बालिकाश्रम रोड परिसरातील काल (शुक्रवारी) पाणी न मिळालेल्या भागात शनिवारी पाणीपुरवठा होईल. तर आज (शनिवारी) रोटेशन असलेल्या शहराच्या मध्यवर्ती भागात पाणी उशिराने आणि कमी दाबाने येणार आहे. नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## 'पाणीसाठे झाकून ठेवा, कोरडा दिवस पाळा' – आयुक्त यशवंत डांगे

**डेंग्यूमुक्त अहिल्यानगर अभियानांतर्गत बूथ हॉस्पिटलमध्ये जनजागृती विद्यार्थ्यांचा सहभाग; घरोघरी जाऊन पाणीसाठ्यांची तपासणी**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'डेंग्यूमुक्त अहिल्यानगर' साप्ताहिक उपक्रमांतर्गत बूथ हॉस्पिटल येथे डेंग्यूविषयक जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून डेंग्यू प्रतिबंधाचा संदेश दिला. तसेच घरोघरी जाऊन पाणीसाठ्यांची तपासणी करण्यात आली आणि नागरिकांना डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले.

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, अहिल्यानगर शहरात गेल्या तीन वर्षांपासून 'डेंग्यूमुक्त अहिल्यानगर' अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून सातत्याने जनजागृती करण्यात आल्याने डेंग्यूच्या रुग्णसंख्येत घट झाली आहे. यंदा आतापर्यंत डेंग्यूचे सरासरी आठ रुग्ण आढळले आहेत. यावर्षी पावसाचे प्रमाण कमी असल्यामुळे पाण्याचा साठा करून ठेवण्याचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. मात्र, साठवलेले पाणी उघडे ठेवल्यास डासांची उत्पत्ती होऊ शकते. डेंग्यूच्या डासांची उत्पत्ती स्वच्छ पाण्यातही होत असल्याने नागरिकांनी पाणीसाठे झाकून ठेवावेत आणि नियमितपणे कोरडा दिवस पाळावा.

नागरिकांनी पाण्याची बचत करण्यासाठी पुढाकार घ्यावा. आहार, विहार आणि निद्रा यांचा योग्य समतोल राखल्यास आरोग्य सुदृढ ठेवण्यास मदत होते. बूथ हॉस्पिटलचे आरोग्यसेवेतील कार्य कौतुकास्पद असून, कोविड महामारीच्या काळात या रुग्णालयाने जिल्ह्यात चांगले काम केले आहे, असेही आयुक्त डांगे यांनी नमूद केले.

ज्येष्ठ नगरसेवक बाळासाहेब बोराटे म्हणाले की, शहरात डेंग्यूमुक्त अभियान राबविणे हा चांगला उपक्रम असून, त्यातून नागरिकांमध्ये आजाराविषयी जागरूकता निर्माण होत आहे. या अभियानामुळे डेंग्यूविषयी जनजागृती वाढली आहे. आयुक्त यशवंत डांगे स्वतः रस्त्यावर उतरून काम करतात, ही चांगली बाब आहे. आरोग्य अधिकारी सतीश राजुरकर यांचेही काम चांगले आहे.

आम्ही जनतेच्या प्रश्नांसाठी आवाज उठवतो; त्यामागे कोणताही वैयक्तिक स्वार्थ नसतो. महापालिकेच्या माध्यमातून शहरात स्वच्छता अभियान राबविले जात आहे; मात्र ते महामार्गापुरते मर्यादित न राहता अंतर्गत कॉलनींमध्येही प्रभावीपणे राबविणे गरजेचे आहे. महापालिकेचा आरोग्य विभाग आरोग्यविषयक सुविधा जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

माजी महापौर सुरेखाताई कदम म्हणाल्या की, महापालिका प्रशासन आपले कर्तव्य पार पाडत असते; मात्र नागरिकांनीही आपली जबाबदारी ओळखून त्यात सक्रिय सहभाग घ्यावा. घरातील कचरा रस्त्यावर न टाकता घंटागाडीतच टाकावा. रस्त्यावर साचणाऱ्या कचऱ्यामुळे साथीचे आजार पसरण्याचा धोका वाढतो. त्यामुळे प्रत्येकाने आपला परिसर स्वच्छ ठेवावा आणि महापालिकेच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा.

बूथ हॉस्पिटलचे प्रमुख सुरेंद्र चोपडे म्हणाले की, त्यांना नगरमध्ये येऊन चार महिने झाले आहेत. वृत्तपत्रांमधून आयुक्त यशवंत डांगे यांच्या कामाची माहिती मिळाली. आयुक्त स्वतः रस्त्यावर उतरून कर्मचाऱ्यांसोबत स्वच्छता अभियानात सहभागी होतात, तसेच नागरिकांच्या घरी जाऊन पाणीसाठ्यांची तपासणी करतात. नागरिकांमध्ये जाऊन प्रत्यक्ष काम करणारे आयुक्त आपण पहिल्यांदाच पाहिले असल्याचे त्यांनी सांगितले. डेंग्यूमुक्त अभियानाच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने जनजागृती होत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी आहारतज्ज्ञ शीतल शिंदे यांनी योग्य आहाराचे महत्त्व आणि डेंग्यू आजाराविषयी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाला ज्येष्ठ नगरसेवक बाळासाहेब बोराटे, माजी महापौर सुरेखाताई कदम, नगरसेवक दत्तात्रय कावरे, नगरसेविका मंगलताई लोखंडे, महापालिकेचे आरोग्य अधिकारी सतीश राजुरकर, बूथ हॉस्पिटलचे प्रमुख सुरेंद्र चोपडे, आहारतज्ज्ञ शीतल शिंदे, ज्योतीताई मोकळ, महादेव भद्रे, डॉ. सृष्टी बनसोडे, डॉ. गौरव देशमुख यांच्यासह पालक, शिक्षक, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोलिसांना शिवीगाळ करत धक्काबुक्की

**पत्नीला मारहाण करणाऱ्याचा प्रताप । शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भिंगार येथील सदर बाजार परिसरात पत्नीला दारूच्या नशेत मारहाण करणाऱ्या इसमाला रोखण्यासाठी गेलेल्या 'डायल ११२' वरील पोलीस कर्मचाऱ्याची कॉलर पकडून त्याला धक्काबुक्की केल्याची घटना घडली. यावेळी संबंधित इसमाने पोलिसांना शिवीगाळही केली. या प्रकरणी शासकीय कामात अडथळा आणल्याच्या आरोपावरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




२३ ऑक्टोबर रोजी दुपारी अडीचच्या सुमारास भिंगारमधील सदर बाजार परिसरात एक इसम दारूच्या नशेत आपल्या पत्नीला लाथाबुक्क्यांनी मारहाण करत असल्याची माहिती 'डायल ११२' वर मिळाली. या तक्रारीनुसार भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यातील ड्युटीवर असलेले पोलीस कॉन्स्टेबल कांतीलाल चव्हाण तातडीने घटनास्थळी पोहोचले. त्यावेळी सतीश रजनीकांत कदम (रा. सदर बाजार, भिंगार) हा पत्नीला शिवीगाळ करून मारहाण करत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

चव्हाण यांनी कदम याला पत्नीला मारहाण करण्यापासून रोखले. याचा राग आल्याने कदम याने पोलिसांशी वाद घालत त्यांना शिवीगाळ केली. तसेच चव्हाण यांची कॉलर पकडून धक्काबुक्की करत शासकीय कर्तव्यात अडथळा आणला. त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक आव्हाड आणि पोलीस नाईक प्रमोद लहारे घटनास्थळी दाखल झाले. आरोपीने त्यांनाही शिवीगाळ केली.

पोलिसांनी सतीश कदम याला ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणले. पोलीस अंमलदार कांतीलाल चव्हाण यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात कदम याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### अवैध वाळू वाहतुकीची जप्त वाहने तहसील कार्यालयाकडे वर्ग करा

अहिल्यानगर - पारनेर तालुक्यात अवैध वाळू वाहतुकीप्रकरणी जप्त करण्यात आलेली वाहने पुढील कायदेशीर कारवाईसाठी पारनेर तहसील कार्यालयाकडे हस्तांतरित करावीत, तसेच वारंवार अवैध गौण खनिज वाहतूक करणाऱ्या वाहनधारकांविरुद्ध कठोर कारवाई करावी, अशी मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली आहे. समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, १९ ऑक्टोबर २०२६ रोजी टाकळी ढोकेश्वर ते पारनेर रस्त्यावर तसेच खडकवाडी शिवारात अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांवर अहिल्यानगर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने कारवाई केली. या कारवाईत संबंधित वाहने आणि मुद्देमाल जप्त करण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मात्र, जप्त वाहनांवर महसूल अधिनियमानुसार पुढील कारवाई होण्यासाठी ती पारनेर तहसील कार्यालयाकडे हस्तांतरित करणे आवश्यक असल्याचे समितीने म्हटले आहे.टाकळी ढोकेश्वर आणि खडकवाडी परिसरात अवैध वाळू वाहतूक सुरू असताना संबंधित मंडळाधिकारी आणि तलाठी यांच्या निदर्शनास हा प्रकार कसा आला नाही, असा सवाल समितीने उपस्थित केला आहे. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने कारवाई करून अवैध वाहतुकीचा प्रकार उघडकीस आणला; मात्र संबंधित महसूल अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडून अशा प्रकारांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. अवैध गौण खनिज वाहतुकीला आळा घालण्यासाठी महसूल विभागाने अधिक दक्षतेने काम करणे आवश्यक आहे. संबंधित भागातील अवैध वाहतुकीवर नियमित देखरेख ठेवून दोषींवर कायद्यानुसार कारवाई केली पाहिजे, अशी भूमिका समितीने मांडली आहे.अवैध वाळू आणि गौण खनिज वाहतुकीप्रकरणी काही वाहनांवर यापूर्वीही अनेक वेळा कारवाई झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तरीही अशा प्रकारांना आळा बसत नसल्याने वारंवार नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनधारकांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी समितीने केली आहे.

### सोपान कोंडीराम वने यांचे निधन

राहुरी - ब्राह्मणी येथील ज्येष्ठ



नागरिक सोपान कोंडीराम वने (वय ८१) यांचे शनिवारी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले असून त्यांच्या जाण्याने परिसरात मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्या पश्चात बहिणी, मुलगा, मुलगी, सून, नातवंडे व परतवंडे असा मोठा परिवार असून, ते आप्पासाहेब वने यांचे वडील, तसेच सौ. राधिका मधुकर म्हसे, अनिता, दादासाहेब व सोमनाथ यांचे आजोबा होत. कै. वने यांचा दशक्रिया विधी सोमवार, दि. २६ ऑक्टोबर २०२६ रोजी देवीचे तळे, ब्राह्मणी येथे पार पडणार आहे.

# समर्पण चातुर्मासानिमित्त आनंद समवशरण येथे उत्तराध्ययन सूत्राचे मंगलमय वाचन

**बोरा व लोढा परिवाराच्या वतीने उत्तराध्ययन ग्रंथाची भव्य शोभायात्रा**




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र प्रवर्तक प. पू. श्री कुंदनऋषिजी म. सा. यांच्या पावन सान्निध्यात सुरू असलेल्या समर्पण चातुर्मासात प. पू. उपाध्याय प्रवर श्री प्रवीणऋषिजी म. सा. यांच्या प्रेरणेने तथा श्री तीर्थेशऋषिजी म. सा. यांच्या सहवासात भगवान महावीर स्वामी यांच्या दिव्य शिकवणीचा अनमोल ठेवा असलेल्या उत्तराध्ययन सूत्राचे मंगलमय वाचन सुरू असून, या धार्मिक उपक्रमाला अहिल्यानगरमधील जैन श्रावक-श्राविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

दिनांक २० ऑक्टोबरपासून सुरू झालेल्या या विशेष उपक्रमांतर्गत दररोज सकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत पूज्य गुरुदेव श्री प्रवीणऋषिजी म. सा. स्वतः उत्तराध्ययन सूत्राचे वाचन करतात. त्यातील गहन आध्यात्मिक तत्त्वज्ञान, जीवनमूल्ये आणि आत्मकल्याणाचा संदेश सर्वसामान्य भाविकांना समजेल अशा सोप्या भाषेत स्पष्ट करून सांगितला जात आहे. गुरुदेवांच्या श्रीमुखातून भगवान महावीर स्वामी यांच्या शिकवणीचे श्रवण करण्यासाठी दररोज हजारोंच्या संख्येने भाविक उपस्थित राहत असून, संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघत आहे.

भगवान महावीर स्वामी यांच्या निर्वाणापूर्वीच्या अखेरच्या ४८ तासांतील उपदेशाचा सार म्हणजे उत्तराध्ययन सूत्र, अशी या उपक्रमाच्या संदर्भात भाविकांमध्ये अनन्य श्रद्धा व्यक्त केली जात आहे. या पवित्र ग्रंथातील शिकवण गुरुदेवांच्या मुखातून श्रवण करण्याची संधी मिळत असल्याने भाविकांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण आहे.

अहिल्यानगरमधील जैन समाजातील विविध गोत्रांतील परिवार या धार्मिक उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी होत आहेत. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे दररोज जैन समाजातील दोन ते तीन गोत्रांतील परिवार एकत्र येऊन उत्तराध्ययन सूत्राच्या पवित्र ग्रंथपालखीची जबाबदारी स्वीकारतात. त्या त्या गोत्रांतील अहिल्यानगर शहरातील सर्व परिवार सदस्य लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत एकत्र येऊन मोठ्या उत्साहात, भक्तिभावाने आणि थाटामाटात आनंदधाम येथून आनंद समवशरणपर्यंत ग्रंथपालखी घेऊन जातात. या उपक्रमातून जैन समाजातील एकोपा, सामूहिक श्रद्धा, गुरुभक्ती आणि धार्मिक संस्कारांचे सुंदर दर्शन घडते.

याच धार्मिक उपक्रमाचा एक भाग म्हणून आज बोरा व लोढा परिवारातील सर्व सदस्यांनी एकत्र येत उत्तराध्ययन सूत्राच्या पवित्र ग्रंथाची भव्य शोभायात्रा आयोजित केली. आनंदधाम येथून बँड-बाजांच्या गजरात, भगवान महावीर स्वामींच्या जयघोषात आणि उत्साहपूर्ण भक्तिमय वातावरणात उत्तराध्ययन सूत्राचा पवित्र ग्रंथ पालखीत विराजमान करून ग्रंथपालखी आनंद समवशरण येथे नेण्यात आली. या शोभायात्रेत अहिल्यानगर शहरातील बोरा व लोढा परिवारातील सदस्य लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सर्वांनी एकत्रितपणे अत्यंत श्रद्धेने आणि भक्तिभावाने या मंगलमय उपक्रमात सहभाग नोंदवत हा ग्रंथ परम पूज्य गुरुदेवांना भक्तिभावाने समर्पित व अर्पण करत गुरुदेवांप्रती आपली भक्ती व्यक्त केली

याच धार्मिक उपक्रमांतर्गत आज बोरा व लोढा परिवाराच्या वतीने उत्तराध्ययन सूत्राच्या पवित्र ग्रंथाची भव्य शोभायात्रा काढण्यात आली. आनंदधाम येथून बँड-बाजांच्या निनादात, भगवान महावीर स्वामी यांच्या जयघोषात आणि प्रचंड भक्तिभावाच्या वातावरणात ग्रंथपालखी आनंद समवशरण येथे नेण्यात आली. या शोभायात्रेत अहिल्यानगर शहरातील बोरा व लोढा परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# १४ वर्षीय श्रावणीच्या उपचारासाठी मदतीचे आवाहन

**छोटासा हातभार ठरू शकतो जीवनाचा आधार ! ब्लड कॅन्सरशी झुंजणाऱ्या श्रावणी किरण पठारे हिला बोन मॅरो ट्रान्सप्लांटची गरज । आर्थिक मदतीसाठी कुटुंबाची आर्तहाक**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** एका बाजूला वयाच्या अवघ्या १४ व्या वर्षी शिक्षण, खेळ आणि स्वप्नांच्या विश्वात रमण्याचे दिवस, तर दुसर्या बाजूला ब्लड कॅन्सरसारख्या गंभीर आजाराशी सुरू असलेली झुंज! श्रावणी किरण पठारे या चिमुरडीवर सध्या उपचार सुरू असून, पुढील उपचारांसाठी बोन मॅरो ट्रान्सप्लांट करणे आवश्यक आहे. या उपचारांसाठी मोठा खर्च अपेक्षित असल्याने श्रावणीच्या मदतीसाठी समाजातील दानशूर व्यक्तींनी पुढे यावे, असे भावनिक आवाहन करण्यात आले आहे.

श्रावणीला अक्यूट मायलॉइड ल्युकेमिया या प्रकारच्या रक्ताच्या कर्करोगाचे निदान झाले आहे. तिच्यावर घोटी येथील एसएमबीटी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आजारावर मात करून तिला पुन्हा नव्याने आयुष्य जगता यावे, यासाठी डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली उपचार सुरू असून, पुढील टप्प्यात बोन मॅरो ट्रान्सप्लांटची आवश्यकता असल्याचे मदतीच्या आवाहनात नमूद करण्यात आले आहे. श्रावणीच्या उपचारांसाठी कुटुंबीयांनी आतापर्यंत सरकारी योजनांच्या माध्यमातून तसेच वैयक्तिक प्रयत्नांतून खर्च भागविण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, पुढील उपचारांसाठी मोठ्या रकमेची आवश्यकता असल्याने कुटुंबासमोर आर्थिक अडचण उभी राहिली आहे. त्यामुळे समाजातील संवेदनशील नागरिक, सामाजिक संस्था, दानशूर व्यक्ती आणि मदतीसाठी पुढाकार घेणार्यांनी श्रावणीच्या उपचारांसाठी आर्थिक हातभार लावावा, अशी विनंती करण्यात आली आहे. प्रत्येकाने आपल्या क्षमतेनुसार ५०, १००, २०० किंवा ५०० रुपये अथवा शक्य असेल तेवढी मदत केल्यास श्रावणीच्या उपचारांसाठी मोठा आधार निर्माण होऊ शकतो. मदतीची रक्कम लहान असली, तरी अनेकांच्या एकत्रित सहकार्यामुळे तिच्या उपचारांच्या खर्चासाठी महत्त्वाची मदत उभी राहू शकते. एका चिमुरडीच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करण्यासाठी समाजाने माणुसकीच्या भावनेतून पुढे यावे. श्रावणीला या कठीण संघर्षातून बाहेर पडण्यासाठी मदतीचा हात देऊया, हीच अपेक्षा!

मदतीसाठी तपशील : रुग्णाचे नाव : श्रावणी किरण पठारे, वय : १४ वर्षे, आजार : ब्लड कॅन्सर, उपचाराचे ठिकाण : एसएमबीटी रुग्णालय, घोटी, फोन पे / गुगल पे क्रमांक : ७८२०८१७८०५, एसएमबीटी रुग्णालय, संपर्क क्रमांक : ०२५३-६९४००००.

**प्रज्ञा १५ व्या राज्यस्तरीय साहित्य संमेलन पनवेलमध्ये नगर येथील**

# कथा लेखक बाळासाहेब देशमुख यांच्या मोसाइक कथासंग्रहाचे प्रकाशन




**प्रज्ञा बहुउद्देशीय राज्यस्तरीय साहित्य संमेलन पनवेलमध्ये कथालेखक बाळासाहेब देशमुख यांच्या मोसाइक कथासंग्रहाचे प्रकाशन करताना डॉ राज यावलीकर, सौ स्नेहा सुभेदार, नागनाथ डोलारे व ज्येष्ठ साहित्यिक.**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प्रज्ञा बहुउद्देशीय संस्था महाराष्ट्र आयोजित १५ वे मराठी साहित्य संमेलन पनवेल येथे रविवार, २५ ऑक्टोबर रोजी संपन्न झाले. संमेलनाध्यक्ष पदी ज्येष्ट साहित्यिक डॉ राज यावलीकर होते. याप्रसंगी व्यासपीठावर संस्थापिका लीना देगलूरकर, गजल मुशायरा अध्यक्ष सौ. सौ स्नेहा सुभेदार , उदय सुभेदार पुणे, आयोजक ज्येष्ठ कवी नागनाथ डोलारे हे मान्यवर होते.

साहित्य संमेलन प्रसंगी बोलताना संस्थापिका लीना देगलूरकर म्हणाल्या समाजामध्ये अनेक लोक वेगवेगळ्या प्रांतांमध्ये,वेगवेगळे कार्य अविरतपणे निष्काम पणे करत असतात. त्यांचे हे कार्य, समाजभान दिशादर्शक असते. अशा अशा साहित्यिकांची, मान्यवरांची मांदीयाळी , आज संमेलन निमित्ताने पाहताना अभिमान दाटून येतो. इंटरनेट, मोबाईलचा अतिवापर टाळत, वाचन संस्कृतीला घराघरातून सर्वांनी प्राधान्य द्यायला हवे. सर्व साहित्यिकांच्या साहित्यकृती पाहताना, वाचताना, त्यांना सन्मानित करताना , ऊर अभिमानाने भरून येतो.

सदर साहित्य संमेलन मध्ये अहिल्यानगर येथील कवी लेखक श्री बाळासाहेब देशमुख यांनी शिकवण ही रचना सादर केली. ग्रामीण भागातील आई-वडील आपल्या मुलांना संगोपन करताना संस्कार, संस्कृतीचे बाळकडू कसे दिले जाते. यावर त्यांनी भाष्य केले. सदर संमेलन मध्ये कथालेखक बाळासाहेब देशमुख यांच्या मोसाइक या चौथ्या कथासंग्रहाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.मोसाइक कथा संग्रहाची प्रस्तावना ज्येष्ठ साहित्यिक , अभ्यासक्रमातील कवी शशिकांत शिंदे व दादासाहेब कोते यांनी लिहिलेली आहे. बाळासाहेब देशमुख यांचे रंग माझा वेगळा, माणसे अशी.. अन् तशीही.., माणसे.. भिंगातून इत्यादी कथासंग्रह अगोदर प्रसिद्ध झालेले आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ साहित्यिक अजित उबाळे, प्रफुल्ल कुलकर्णी यांनी केले. तर ज्येष्ठ साहित्यिक गणपत तरंगे यांनी आभार प्रदर्शन व्यक्त केले.

# दिवाळी तोंडावर, पैठण तालुक्यात आनंदाचा शिधा अद्याप प्रतीक्षेत!

**दुष्काळाच्या झळांनी ग्रामीण भागातील कुटुंबांचे आर्थिक गणित बिघडले; शिधावाटपाबाबत नागरिकांमध्ये संभ्रम**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** दिवाळीचा सण जवळ येऊन ठेपला असतानाही पैठण तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना शासनाच्या आनंदाच्या शिध्याची प्रतीक्षा कायम आहे. यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने शेतीच्या उत्पादनावर परिणाम झाला असून, शेतकरी आणि सर्वसामान्य कुटुंबांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत दिवाळी गोड करण्यासाठी शासनाकडून मिळणाऱ्या आनंदाच्या शिध्याचे वाटप कधी सुरू होणार, असा सवाल लाभार्थ्यांकडून उपस्थित केला जात आहे.

**दुष्काळाच्या झळा, सणाचा खर्च वाढला**

पैठण तालुक्यातील ग्रामीण भागात कमी पावसामुळे शेती व्यवसायावर परिणाम झाला आहे. अनेक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात घट झाल्याने दैनंदिन गरजा भागविताना कसरत करावी लागत आहे. त्यातच दिवाळीचा सण तोंडावर आल्याने कपडे, फराळ आणि इतर आवश्यक वस्तूंच्या खर्चाची भर पडली आहे. त्यामुळे शासनाकडून मिळणाऱ्या मदतीकडे आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांचे लक्ष लागले आहे.

**शिधावाटपाचे नियोजन जाहीर करण्याची मागणी**

सणासुदीच्या काळात पात्र शिधापत्रिकाधारकांना दिलासा मिळावा, या उद्देशाने शासनाकडून आनंदाचा शिधा वितरित केला जातो. मात्र, यंदा पैठण तालुक्यातील ग्रामीण भागात या शिध्याच्या वाटपाबाबत अद्याप स्पष्टता नसल्याने लाभार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. दिवाळीपूर्वी आनंदाचा शिधा मिळाल्यास गोरगरीब कुटुंबांना सण साजरा करताना काही प्रमाणात आर्थिक आधार मिळू शकतो. त्यामुळे संबंधित पुरवठा विभागाने वाटपाबाबतची सद्यस्थिती स्पष्ट करून पात्र लाभार्थ्यांना वेळेत शिधा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी ग्रामीण भागातून होत आहे.

**दिवाळीपूर्वी शिधा मिळणार का?**

दिवाळी काही दिवसांवर आली असताना आनंदाच्या शिध्याच्या वाटपाबाबत प्रशासनाकडून स्पष्ट माहिती मिळण्याची नागरिकांना अपेक्षा आहे. शासनाची योजना पात्र लाभार्थ्यांपर्यंत वेळेत पोहोचणार का, याकडे आता पैठण तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# शहीद अशफाकुल्ला खान यांच्या जयंतीनिमित्त अल हादी तर्फे मुकुंदनगर येथे व्याख्यान

**शहीद अशफाकुल्ला खान देशभक्ती आणि एकतेचे प्रतीक – प्रो.नवेद बिजापूरे**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अल हादी एज्युकेशन सोसायटीच्या वतीने थोर स्वातंत्र्यसैनिक आणि क्रांतिकारक शहीद अशफाकुल्ला खान यांच्या जयंतीनिमित्त मुकुंदनगर येथे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक नवेद बिजापुरे आणि मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष आबिद दुलेखान उपस्थित होते.

शहीद अशफाकुल्ला खान यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी दिलेला लढा, त्यांचे देशप्रेम, त्याग आणि बलिदान यांची आठवण या कार्यक्रमाच्या निमित्ताने करण्यात आली. ब्रिटिशांच्या अन्यायकारक राजवटीविरुद्ध लढताना त्यांनी देशाच्या स्वातंत्र्याला सर्वोच्च प्राधान्य दिले. मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यांच्या जीवनातून आजच्या तरुण पिढीला देशभक्ती, धैर्य, त्याग आणि राष्ट्रीय एकात्मतेची प्रेरणा मिळते. शहीद अशफाकुल्ला खान यांचे जीवन हे हिंदू-मुस्लिम ऐक्याचे आणि सर्वधर्मसमभावाचे प्रेरणादायी प्रतीक आहे. स्वातंत्र्यलढ्यात विविध धर्मांच्या क्रांतिकारकांनी एकत्र येऊन देशासाठी संघर्ष केला. त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे आणि विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेमाची भावना रुजविणे ही काळाची गरज आहे, असा संदेश प्रोफेसर नवेद बिजापुरे यांनी या जयंती कार्यक्रमाच्या माध्यमातून दिला. शहीद अशफाकुल्ला खान यांच्या स्मृतींना अभिवादन करून त्यांच्या देशभक्तीच्या विचारांचे स्मरण करण्यात आले. अशा कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांना भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास समजण्यास मदत होते आणि समाजात राष्ट्रीय एकात्मता व बंधुभावाची भावना दृढ होण्यास हातभार लागतो.असे आबीद खान यांनी नमूद केले.

# पैठणमध्ये आयशरमधून १३ म्हशींची निर्दयी वाहतूक; १३ लाखांचा मुद्देमाल जप्त

**दक्षिण जायकवाडी फाट्यावर पोलिसांची कारवाई; जनावरांसाठी चारा-पाण्याची व्यवस्था नसल्याचा आरोप**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पैठण शहरातील दक्षिण जायकवाडी फाटा येथे आयशर वाहनातून १३ म्हशींची निर्दयीपणे वाहतूक होत असल्याचा प्रकार २४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी उघडकीस आला. पैठण पोलिसांनी केलेल्या कारवाईत १३ म्हशी आणि वाहतुकीसाठी वापरण्यात आलेले आयशर वाहन असा एकूण १३ लाख ७३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी शेवगाव येथील एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २४ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास दक्षिण जायकवाडी फाटा, पैठण येथे ही कारवाई करण्यात आली. आरोपी शेख हाजी फकीर मोहम्मद (वय ५१, रा. नाईकवाडी मोहल्ला, शेवगाव, जि. अहिल्यानगर) हा आयशर कंपनीच्या विटकरी रंगाच्या वाहनातून १३ म्हशींची वाहतूक करताना आढळून आला.

वाहतूक करताना जनावरांसाठी चारा-पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली नव्हती. तसेच जनावरांना आखूड दोरीने बांधून त्यांना त्रास होईल अशा पद्धतीने वाहतूक केली जात असल्याचे पोलिसांच्या फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या कारवाईत विविध जातींच्या १३ म्हशी व वगार यांची अंदाजे तीन लाख ७३ हजार रुपये किंमत, तर ०७ ६६३३ क्रमांकाच्या आयशर वाहनाची अंदाजे दहा लाख रुपये किंमत, असा एकूण १३ लाख ७३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी पोलीस अंमलदार अविनाश संजय शिंदे यांनी फिर्याद दिली. पैठण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस अंमलदार पुरी पुढील तपास करीत आहेत.

**पोलिसांची कारवाई :** पैठण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

# महाराष्ट्र वारकरी – शेतकरी संघटनेवर झेंडे, रोडे, तोडमल, गायकवाड यांची निवड



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर येथे व्हीआयपी सर्किट हाऊस मध्ये अखिल महाराष्ट्र वारकरी शेतकरी संघटनेच्या पदाधिकारी व स्वयंसेवकाची एकत्रित बैठक संपन्न झाली. या बैठकीला राज्यातून पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीत सर्वानुमते, एकमुखी निर्णयाने संघटनेची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

अखिल महाराष्ट्र वारकरी शेतकरी संघटनेच्या अध्यक्षपदी बाबा महाराज झेंडे, उपाध्यक्षपदी नारायण रोडे, सचिवपदी संजय तोडमल तर कार्याध्यक्षपदी ज्ञानेश्वर गायकवाड यांची निवड जाहीर करण्यात आली. यावेळी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना झेंडे महाराज म्हणाले, वारकरी व शेतकरी यांच्या प्रश्नांना न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात संघटनेच्या शाखा उभारल्या जातील.सध्या दुष्काळाची परिस्थिती गंभीर असल्याने जनावरांच्या चारा प्रश्न महत्त्वाचा आहे, त्यासाठी छावण्या सुरू करण्याचा प्रस्ताव देऊन प्राधान्य आम्ही देणार आहे. जगाचा पोशिंदा शेतकरी जगविण्यासाठी तो वाचला पाहिजे. यासाठी त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणार तसेच समाजाला नैतिकता, नितिमत्ता, सहिष्णुतेचा, अहिंसेचे शिकवण देणारी जगातील अद्वितीय संघटन म्हणजे वारकरी आहे. हा वारकरी म्हणजे पंढरीच्या विठोबाची अलिखित संघटना असून त्याचा पाया ज्ञानोबा माऊलींनी रचला तर कळस जगदगुरु तुकोबारायांनी उभा केला. पांडुरंगाने स्वतः प्रकट होऊन सर्व जाती-धर्माच्या संतांना अंगा खांद्यावर घेतले, जनसेवा ही खरी ईश्वर सेवा हा संदेश जगाला दिला, तेच काम आमचे वारकरी करीत आहेत. तेव्हा वारकऱ्यांच्या प्रश्नांना न्याय दिल्याशिवाय आम्ही गप्प बसणार नाही. असे श्री.झेंडे महाराजांनी शेवटी सांगितले. यावेळी अँड.राजेंद्र वाबळे म्हणाले शेतकरी आज उपासमारीने मरायला लागला आहे. त्याचे पशुधन मरणाच्या यातना सोसत आहे. तो वाचला तर जग वाचेल तेव्हा शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी त्यांचे हक्काचे अधिष्ठाण उभे राहण्यासाठी शेतकरी वारकरी संघटनेची स्थापना झाली आहे.

यावेळी जालिंदर जगताप, गोवर्धन काळे, पाराजी शिंदे, रोहिदास पंदरकर, भानुदास पवार,सुनील लोंढे, बबनराव साबळे,अनिल कानगुडे, महादेव पिंपळे, हभप गव्हाणे महाराज, नवनाथ आव्हाड, महेश वाघ, रोहिदास उदमले, भाऊसाहेब काळे, संतोष मोरे, मनोहर पाटील, प्रतिभाताई धस, वैष्णवीताई पवार, कविता खासेराव तसेच अनेक मान्यवर स्वयंसेवक पदाधिकारी उपस्थित होते. शेवटी सर्वांचे आभार बारा बलुतेदार महासंघाचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर गायकवाड यांनी मानले.

# वैद्यकीय शिक्षणात तंत्रज्ञानासोबत सेवाभाव आणि मानवी मूल्ये जपा!

## पद्मभूषण डॉ. दत्तात्रेयुडू नोरी यांचा विद्यार्थ्यांना मोलाचा संदेश; विखे पाटील विद्यापीठाच्या पहिल्या बॅचचा स्वागत समारंभ उत्साहात



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे वैद्यकीय क्षेत्रात मोठे परिवर्तन घडत असताना डॉक्टरांनी मानवी मूल्ये, सहानुभूती आणि सेवाभावाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे आवाहन आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कर्करोगतज्ज्ञ पद्मभूषण डॉ. दत्तात्रेयुडू नोरी यांनी केले. वैद्यकशास्त्राचे भविष्य केवळ प्रयोगशाळांमध्ये घडत नाही, तर व्यक्तींच्या विचारांत आणि कृतीत घडते. वैद्यकीय सेवेच्या केंद्रस्थानी आध्यात्मिक सेवाभाव असतो, हे कधीही विसरू नका, असा मोलाचा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. पद्मश्री डॉ. विखे पाटील फाउंडेशनच्या वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएसच्या २३ व्या बॅचमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसह नव्याने स्थापन झालेल्या लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील विद्यापीठाच्या पहिल्या बॅचमधील विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभात ते बोलत होते.या वेळी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मोहन खामगावकर, आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. दिलीप म्हैसेकर, अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विष्णू मगरे, वसंतराव कापरे, नंदकुमार झावरे, सुभाष पाटील, उत्तमराव कदम, सुभाषराव भदगले, विनायकराव देशमुख, डॉ. अभिजित दिवटे आणि डॉ. पांडुरंग गायकवाड यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. वैद्यकीय शिक्षणातील बदलत्या स्वरूपावर भाष्य करताना डॉ. नोरी म्हणाले की, वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांसमोर बुद्धिमत्ता, नैतिक मूल्ये, सहानुभूती आणि बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता सिद्ध करण्याचे मोठे आव्हान आहे. संगणकीय तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान आणि मानवाप्रती असलेली करुणा यांचा समन्वय साधणे ही आधुनिक वैद्यकीय सेवेची गरज बनली आहे. कर्करोगावरील उपचारांमधील बदलांचा अनुभव सांगताना त्यांनी निदान, शस्त्रक्रिया आणि किरणोत्सर्गावर आधारित पारंपरिक उपचारपद्धतींपासून आधुनिक कर्करोगशास्त्राने मोठी प्रगती केल्याचे नमूद केले. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि जनुकीय माहितीच्या विश्लेषणाच्या मदतीने रुग्णाची जैविक वैशिष्ट्ये, जीवनशैली आणि सामाजिक-आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन अधिक अचूक व वैयक्तिक स्वरूपाचे उपचार सुचविणे शक्य होणार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

वैद्यकीय शास्त्रात तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले, तरी रुग्णाची जीवनकहाणी विसरू नका, असे सांगत डॉ. नोरी यांनी विद्यार्थ्यांना मानवी दृष्टिकोन जपण्याचे आवाहन केले. प्रत्येक वैद्यकीय अहवालामागे एक मानवी जीवन आणि त्याच्या कुटुंबाचे भविष्य दडलेले असते. त्यामुळे भविष्यातील डॉक्टरांनी जीवशास्त्र, माहिती तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी विज्ञानासोबतच मानवी मूल्यांचीही जाण विकसित करणे आवश्यक आहे. उत्कृष्ट वैद्यकीय सेवा केवळ मोठ्या आणि नामांकित रुग्णालयांमध्येच दिली जाते असे नाही, तर जिथे वैद्यकीय सेवेची खरी गरज आहे, तिथेही डॉक्टरांनी तत्परतेने सेवा द्यावी. प्रार्थना करणाऱ्या ओठांपेक्षा सेवा करणारे हात अधिक पवित्र असतात. प्रत्येक रुग्णाची भेट म्हणजे मानवी रूपातील परमेश्वराची सेवा करण्याची संधी आहे, या शब्दांत त्यांनी विद्यार्थ्यांना सेवाभावी वृत्तीने कार्य करण्याचा संदेश दिला.

जलसंपदामंत्री तथा डॉ. विखे पाटील फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी हा समारंभ ऐतिहासिक असल्याचे नमूद केले. राज्यातील पहिल्या खासगी ग्रामीण विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्याचा हा क्षण संस्थेसाठी महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. विखे पाटील म्हणाले की, विखे पाटील फाउंडेशनच्या वैद्यकीय महाविद्यालयाने २३ वर्षांचा प्रवास पूर्ण केला आहे. विद्यापीठ स्थापनेचे स्वप्न साकार झाल्याचा मोठा आनंद आहे. या महाविद्यालयात प्रवेश घेतलेले विद्यार्थी आता फाउंडेशनच्या परिवाराचा भाग झाले असून, कुटुंबाप्रमाणे त्यांच्या पालकत्वाची जबाबदारी स्वीकारण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवासात येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी लवकरच हेल्पलाईन सुरू करण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी केली. पद्मभूषण डॉ. दत्तात्रेयुडू नोरी यांच्यासारखे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कर्करोगतज्ज्ञ या समारंभाला उपस्थित असल्याबद्दल समाधान व्यक्त करताना डॉ. विखे पाटील यांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला. शिर्डीचा आध्यात्मिक संदेश न्यूयॉर्कपर्यंत पोहोचवत त्यांनी तेथे साईमंदिर उभारले. त्यांच्या मार्गदर्शनातून विखे पाटील फाउंडेशन आणि नव्याने स्थापन झालेले विद्यापीठ देशात अग्रस्थानी पोहोचेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. डॉ. नोरी यांनी आपल्या भावना व्यक्त करताना भारताशी असलेले आपले नाते अधोरेखित केले. विविध संस्थांशी जोडलेले असतानाही आपले मन भारताशी घट्ट जोडलेले आहे. विखे पाटील फाउंडेशनच्या कर्करोग रुग्णालयातून जागतिक दर्जाची आरोग्यसेवा देण्यासाठी आपण नेहमीच प्रयत्नशील राहिलो आहोत, असे त्यांनी सांगितले.

# भैय्या बॉक्सर यांना 'विश्व शांतीदूत' पुरस्कार प्रदान!

## कोरोना काळातील सामाजिक कार्याची दखल



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सामाजिक बांधिलकी जपत गरजवंतांना मदतीचा हात देणारे सामाजिक कार्यकर्ते भैय्या बॉक्सर यांना 'विश्व शांतीदूत पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. फ्रीडम फाउंडेशनच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित पुरस्कार सोहळ्यात त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेण्यात आली. हेल्पिंग हॅन्ड्स युथ फाउंडेशनच्या माध्यमातून शैक्षणिक, आरोग्य, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना हा सन्मान करण्यात आला.

फ्रीडम फाउंडेशन आणि ग्लोरिअस ग्लोबल सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने, फ्रीडम फाउंडेशनचे संस्थापक बिशप डॉ. प्रदीप वाघमारे यांच्या पुढाकाराने या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. समाजात शांतता, बंधुभाव, मानवता आणि सामाजिक सलोखा वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ११ व्यक्तींना 'विश्व शांतीदूत पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.

पुरस्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी बिशप प्रा. डॉ. अनिश विजागत आणि प्रा. ज्युलिया विजागत उपस्थित होते. फ्रीडम फाउंडेशनचे संस्थापक बिशप डॉ. प्रदीप वाघमारे आणि विश्वस्त बिशप डॉ. साधना कदम यांच्या हस्ते पुरस्कारार्थींना सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे व सहकारी म्हणून जॉन्सन पॉलूस, राजेंद्र कदम, प्राजक्ता राठोड, डॉ. रुपाली साळवी आणि एलिझाबेथ लोंढे यांची विशेष उपस्थिती होती. कोरोना महामारीच्या कठीण काळात अनेकांना अन्नधान्य आणि दैनंदिन गरजांच्या वस्तू मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागत होता. अशा परिस्थितीत भैय्या बॉक्सर यांनी पुढाकार घेत अनेक बेवारस आणि गरजू व्यक्तींना मदतीचा हात दिला. त्यांनी गरजूंना मोफत जेवणाची व्यवस्था केली, तसेच अनेक कुटुंबांच्या घरी स्वखर्चातून किराणा माल आणि अन्नधान्य पोहोचवून माणुसकीचे दर्शन घडविले.

संकटाच्या काळात समाजातील वंचित आणि गरजू घटकांच्या मदतीसाठी त्यांनी केलेले कार्य विशेष उल्लेखनीय ठरले.

शिक्षणापासून कोणताही विद्यार्थी वंचित राहू नये, या भावनेतून भैय्या बॉक्सर यांनी झोपडपट्टी भागातील शाळकरी मुलांना वेळोवेळी शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिले. आर्थिक अडचणींमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होऊ नयेत, यासाठी त्यांनी मदतीचा हात पुढे केला. शिक्षण, आरोग्य आणि क्रीडा क्षेत्रातील विविध उपक्रमांच्या माध्यमातून समाजातील गरजू घटकांपर्यंत मदत पोहोचविण्याचा त्यांचा प्रयत्न सातत्याने सुरू आहे.

याशिवाय, सांस्कृतिक क्षेत्रातील कलाकारांच्या विविध प्रश्नांसाठीही ते सक्रियपणे काम करतात. कलाकारांना भेडसावणाऱ्या अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी संबंधितांकडे पाठपुरावा करणे, त्यांच्या समस्या मांडणे आणि त्यांना आवश्यक सहकार्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, अशा माध्यमांतून त्यांनी कलाकारांप्रती असलेली बांधिलकी जपली आहे. पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# ओंकार शुगरच्या तिसऱ्या गळीत हंगामाचा शुभारंभ; शेतकरी व तोडणी-वाहतूकदारांना आठ दिवसांत पेमेंट देणार

## चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांची ग्वाही; देवदैठण येथे बॉयलर अग्निप्रदीपन सोहळा उत्साहात

**दैनिक आकर्षण । केशव कातोरे**

**बेलवंडी –** श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथील ओंकार शुगर अँड अलाइड इंडस्ट्रीज प्रा. लि. युनिट क्रमांक ७ च्या तिसऱ्या गळीत हंगामाचा शुभारंभ रविवार, दि. २५ ऑक्टोबर २०२६ रोजी उत्साहात संपन्न झाला. यावेळी बॉयलर अग्निप्रदीपन विधी पार पडला. कारखान्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांच्या शुभहस्ते हंगामाचा प्रारंभ करण्यात आला. शेतकरी आणि ऊस तोडणी-वाहतूकदारांना आठ दिवसांत पेमेंट देण्यात येईल, अशी महत्त्वपूर्ण ग्वाही यावेळी बाबुराव बोत्रे पाटील यांनी दिली. या कार्यक्रमाला ओंकार ग्रुपच्या संचालिका रेखाताई बोत्रे, सीईओ तेजस्विनी बर्गे, संचालक अतुल जाधव,माजी जिल्हा परिषद सदस्य दिनुकाका पंदरकर, मा. सरपंच सचिन चौधरी,ईश्वरी गुरुजी, मा.सरपंच रवींद्र शिंदे,सोमनाथ खेडकर, केशव महाडीक, राजेंद्र ओहळ सर ,टिळक भोस,परिसरातील शेतकिरी यांच्यासह कारखान्याचे संचालक, अधिकारी, कर्मचारी आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना चेअरमन बाबुराव बोत्रे




पाटील यांनी ऊस उत्पादक शेतकरी आणि तोडणी-वाहतूकदारांच्या हिताला प्राधान्य देण्याची कारखाना व्यवस्थापनाची भूमिका स्पष्ट केली. ऊस उत्पादकांना जिल्ह्यामध्ये उच्चांक योग्य दर, वेळेत ऊसखरेदी, काटेकोर वजन आणि पारदर्शक व्यवहार यावर कारखाना व्यवस्थापनाचा भर राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शेतकऱ्यांचा विश्वास कायम राखण्यासाठी आणि त्यांना वेळेत आर्थिक मोबदला मिळावा यासाठी व्यवस्थापनाकडून प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी नमूद केले. शेतकरी आणि तोडणी-वाहतूकदारांना आठ दिवसांत पेमेंट देण्याच्या घोषणेमुळे गळीत हंगामात ऊस पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक नियोजनासाठी दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. ऊस तोडणी आणि वाहतूक यंत्रणा सुरळीत राहण्यासाठी वेळेवर पेमेंट महत्त्वाचे ठरणार आहे. आधुनिक तंत्रज्ञान, उत्कृष्ट व्यवस्थापन आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांशी समन्वय साधून यंदाचा गळीत हंगाम यशस्वी करण्याचा कारखाना व्यवस्थापनाचा प्रयत्न राहणार आहे. तिसऱ्या गळीत हंगामाच्या शुभारंभामुळे देवदैठण परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.यावेळी जनरल मॅनेजर स्वपनील गावडे यांनी प्रास्ताविक केले व सूत्रसंचालन अनिल बनकर यांनी केले.


(पान १ वरून)


## राहुरीतील वाहतूक कोंडीचा प्रश्न दोन दिवसांत मार्गी लावणार!

जात आहे. दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर रस्त्यावरील वाहनांची संख्या वाढली असून, वाहतूक कोंडीमुळे प्रवाशांचा वेळ वाया जात आहे. या पार्श्वभूमीवर माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी राहुरी फॅक्टरी येथे थांबून परिस्थितीची पाहणी केली. वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशा सूचना त्यांनी दिल्या. तसेच पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्याशी चर्चा करून वाहतूक व्यवस्थापनाबाबत आवश्यक त्या सूचना केल्या. दरम्यान, सकाळपासूनच डॉ. सुजय विखे पाटील यांचे सहकारी आणि पोलीस प्रशासन वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी प्रयत्नशील होते. वाहनांची ये-जा सुरळीत व्हावी आणि प्रवाशांना दिलासा मिळावा, यासाठी वाहतूक नियंत्रित करण्याचे प्रयत्न करण्यात आले. मात्र, वारंवार निर्माण होणाऱ्या या वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची गरज व्यक्त होत आहे. यासाठी येत्या दोन दिवसांत प्रशासन आणि संबंधित ठेकेदार यांची बैठक घेऊन उपाययोजनांबाबत निर्णय घेण्यात येईल, असे डॉ. सुजय विखे पाटील यांनी स्पष्ट केले. गेल्या काही दिवसांपासून वाहतूक कोंडीने त्रस्त झालेल्या वाहनचालक आणि प्रवाशांचे लक्ष आता प्रशासनाच्या पुढील कार्यवाहीकडे लागले आहे.

## जन्मदात्या पित्याचा मुलांनीच खून केल्याचे निष्पन्न

पित्याचे नाव आहे. दिनांक २४ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास वाकोडी येथील पाण्याच्या टाकीजवळ दिलीप भोसले यांना अज्ञात व्यक्तींनी अमानुष मारहाण करून त्यांची हत्या केली होती. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल बिभीषण काशिनाथ दिवटे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात बीएनएस कलम खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. माहिती मिळताच पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन व अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला आरोपींच्या शोधाचे आदेश दिले. त्यानुसार, पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक हरीक्ष भोये, अंमलदार अतुल लोटके, फुरकान शेख, भाऊसाहेब काळे, अमोल कोतकर आणि पथकाची नियुक्ती केली.या पथकाने घटनास्थळी भेट देऊन गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास करत मयत दिलीप भोसले यांचा खून त्यांचीच मुले अंबर दिलीप भोसले आणि रोहित दिलीप भोसले यांनी निष्पन्न केले. केला आहे. याप्रकरणी वाकोडी परिसरातून अंबर दिलीप भोसले (वय १९) याला ताब्यात घेतले. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीला पुढील तपासासाठी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले असून, खुनामागचे नेमके कारण शोधण्याचे काम भिंगार पोलीस करत आहेत.

## शेतीच्या वादातून तलवारीने हल्ला, चौघांना ७ वर्षे सक्तमजुरी व दंड

एस. एस. पाटील यांनी सखोल तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. खटल्यादरम्यान सरकार पक्षातर्फे एकूण ७ साक्षीदार तपासण्यात आले. यात फिर्यादी, जखमी मुलगा, प्रत्यक्षदर्शी आणि वैद्यकीय अधिकारी यांच्या साक्षी महत्त्वपूर्ण ठरल्या. जिल्हा सरकारी वकील सतीश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक सरकारी वकील केदार गोविंद केसकर यांनी प्रभावी युक्तिवाद केला. पोलिसांचा तपास आणि सरकारी वकिलांच्या भक्कम पुराव्यांमुळे न्यायालयासमोर गुन्हा सिद्ध झाला. याकामी पैरवी अधिकारी म्हणून पोलीस हवालदार एन. आय. नरुटे यांनी सहकार्य केले.

## काँग्रेसला येत असलेल्या अपयशामुळे मल्लिकार्जुन खरगेंचे वैफल्यग्रस्त विधान - ना. राधाकृष्ण विखे पाटील

चाऱ्याला जिल्हाबंदी केल्याने जर कुठे काही प्रश्न निर्माण होत असतील, तर छत्रपती संभाजीनगर आणि अहिल्यानगरच्या जिल्हाधिकाऱ्यांशी तातडीने चर्चा करून यावर तात्काळ सुवर्णमध्य काढला जाईल. सध्या कमी पाण्यात कमी जागेत पौष्टिक चारा उपलब्ध करून देणाऱ्या हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञानाचा उपयोग करून चारा निर्मिती करण्यालाच प्रशासनाने प्राधान्य दिले आहे. यासाठी जिल्हा नियोजन समिती किंवा टंचाई निधीतून आवश्यक तो निधी वेळेत उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यासाठी दर्जेदार फटाके उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न : आमदार संग्राम जगताप

खरेदी करावी आणि फटाके फोडताना सुरक्षिततेच्या नियमांचे पालन करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

अहमदनगर फटाका व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष गजेंद्र राशिनकर यांनी प्रास्ताविकात मार्केट उभारण्यामागील भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, दिवाळीच्या सणानिमित्त नागरिकांना दर्जेदार फटाके एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावेत आणि फटाके खरेदी करताना ग्राहकांची गैरसोय होऊ नये, या उद्देशाने असोसिएशनच्या वतीने दरवर्षी कल्याण रोड येथे घाऊक फटाका मार्केटचे आयोजन केले जाते. यंदाही ग्राहकांच्या सोयीसाठी विविध प्रकारचे फटाके उपलब्ध करून देण्याबरोबरच पार्किंगसह आवश्यक सुविधांचे नियोजन करण्यात आले आहे. व्यापाऱ्यांना व्यवसायासाठी योग्य व्यासपीठ मिळावे आणि ग्राहकांना चांगल्या दर्जाचे फटाके व समाधानकारक सेवा मिळावी, यासाठी असोसिएशनचे सर्व पदाधिकारी एकत्रितपणे प्रयत्न करीत आहेत. या उपक्रमाला नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

असोसिएशनचे सचिव सुरेश जाधव यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, दिवाळीच्या काळात फटाक्यांना मोठी मागणी असते. नागरिकांना विविध प्रकारचे फटाके एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावेत आणि व्यापाऱ्यांना व्यवसायासाठी योग्य व्यासपीठ मिळावे, या हेतूने मार्केटचे आयोजन केले जाते. ग्राहकांची वाढती संख्या लक्षात घेऊन मार्केटमध्ये आवश्यक सुविधांचे नियोजन करण्यात आले आहे. व्यापारी आणि ग्राहक यांच्यात सुसंवाद राहावा, तसेच खरेदीचा अनुभव चांगला व्हावा, यासाठी असोसिएशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे सहकार्य लाभत आहे. नागरिकांनी सुरक्षिततेची काळजी घेत दिवाळीचा आनंद साजरा करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

या शुभारंभप्रसंगी अहमदनगर फटाका व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष गजेंद्र राशिनकर, उपाध्यक्ष मयूर भापकर, संजय जंजाळे, सचिव सुरेश जाधव, सहसचिव अमोल तोडकर, खजिनदार गणेश शिरसागर, कार्याध्यक्ष डी. एम. ढवळे ,श्रीनिवास बोज्जा ,गणेश परभाने ,विकास पटवेकर ,संभाजी कराळे ,शिरीष चंगेडे ,सोमनाथ रोकडे,अशोक कर्डीले ,छबुराव जाधव ,सुनील पोपटानी ,प्रकाश मुथा ,अरविंद काळे ,निखिल परभाने ,अनिल टकले ,राम मुलतानी ,संतोष तोडकर ,ओम दारकुंडे ,सोमनाथ देवकर,सतीश दारकुंडे ,विजय मुनोत ,विजय मुनोत ,अरविंद साठे ,सुनील गांधी यांच्यासह असोसिएशनचे पदाधिकारी, व्यापारी आणि नागरिक उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी फटाका मार्केटच्या आयोजनाबद्दल समाधान व्यक्त करत दिवाळीच्या खरेदीसाठी नागरिकांना एकाच ठिकाणी विविध सुविधा उपलब्ध होणार असल्याचे नमूद केले.

कार्यक्रमाची सुरुवात असोसिएशनचे उपाध्यक्ष मयूर भापकर यांनी प्रास्ताविक करून केली. त्यांनी मार्केटच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट करत उपस्थितांचे स्वागत केले. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर ग्राहकांना चांगल्या सुविधा देण्यासाठी असोसिएशनच्या वतीने करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती त्यांनी दिली. कार्यक्रमाला उपस्थित राहिल्याबद्दल आमदार संग्राम जगताप यांच्यासह सर्व मान्यवरांचे त्यांनी आभार मानले.